**ठळक बातम्या**

- पेट्रोल, डीझेल आणि विमान इंधन निर्यातीवरच्या सुधारित शुल्काची अधिसूचना जारी
- भारत-अमेरिका व्यापार करार लवकरच पूर्ण होईल, असा केंद्रीय अर्थमंत्र्यांना विश्वास
- आंदोलनाच्या नावाखाली काँग्रेस आणि विरोधी पक्ष देशात अराजक माजवून निवडणुकीतल्या पराभवाचा बदला घेत असल्याचा संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांचा आरोप
- आंदोलनं आणि निदर्शनांचं वार्तांकन करण्यासाठी प्रेस काउन्सिलची मार्गदर्शक तत्त्वं जारी

**आणि**

- जगातली पहिली मिश्र क्रिकेट स्पर्धा येत्या १४ नोव्हेंबरपासून श्रीलंकेत होणार

<><><><><>

पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधन निर्यातीवरच्या सुधारित निर्यात शुल्काची अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. हे दर आजपासून पुढच्या पंधरवड्यासाठी लागू असतील. या सुधारित दरांनुसार, पेट्रोलच्या निर्यातीवर अडीच रुपये प्रतिलीटर शुल्क आकारलं जाणार आहे. यापूर्वी २ रुपये प्रतिलीटर शुल्क आकारलं जात होतं. डीझेलच्या निर्यातीवरच्या शुल्कात मात्र घट करण्यात आली असून ते साडे आठ रुपये प्रतिलीटर करण्यात आलं आहे. यापूर्वी ते १६ रुपये प्रतिलीटर दराने आकारलं जात होतं. एटीएफ अर्थात विमान इंधनासाठीचं शुल्क मात्र साडे दहा रुपयांवर कायम ठेवण्यात आला आहे. या इंधनांच्या आंतरराष्ट्रीय बाजारभावातल्या सरासरी किमतींच्या आधारे हे दर निश्चित करण्यात आले आहेत.

<><><><><>

भारत अमेरिका व्यापार करार लवकरच पूर्ण होईल असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केली आहे. थायलंडमध्ये बँकॉक इथे सुरु असलेल्या जागतिक नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या वार्षिक बैठकीदरम्यान अटलांटिक परिषदेत त्या बोलत होत्या. भारत अमेरिका व्यापार करारामुळे दोन्ही देशांमधले आर्थिक संबंध बळकट होतील, शिवाय जागतिक व्यापारावर सकारात्मक परिणाम होईल असं त्या म्हणाल्या. कराराचा पहिला

टप्पा पूर्ण झाला असून त्याचा कायदेशीर मसुदा तयार करण्याचं काम सुरु असल्याची माहिती वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी दिली असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

जागतिक बँक समूहाने गेल्या वर्षी गोळा केलेल्या खाजगी भांडवलात अमेरिका आणि ब्रिटनच्या बरोबरीने भारताचा मोठा वाटा होता असं जागतिक बँकेचे अध्यक्ष अजय बंगा यांनी म्हटलं आहे. थायलंडमध्ये बँकॉक इथे सुरु असलेल्या जागतिक बँक वार्षिक बैठकीच्या समारोप सत्रात ते बोलत होते. जागतिक बँकेने सुमारे ११० देशांमधून खाजगी भांडवल गोळा केलं आहे. त्याची रक्कम २०२२ साली ३५ बिलियन डॉलर्स होती, आणि गेल्या वर्षीपर्यंत ती तिपटीने वाढून ११२ बिलियन डॉलर्सपर्यंत पोचल्याच त्यांनी सांगितलं.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर ७ पूर्णांक १ दशांश ते ७ पूर्णांक ३ दशांश टक्के राहण्याची शक्यता डेलॉइट इंडिया या कंपनीने वर्तवली आहे. स्थूल स्थिर भांडवल निर्मितीत पहिल्या तिमाहीत ११ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांनी वाढ झाली असून ही गेल्या चार वर्षातली उच्चांकी वाढ आहे. खाजगी गुंतवणुकीत स्थिर वाढ अपेक्षित आहे परंतु भूराजकीय परिस्थिती आणि उर्जास्त्रोतांच्या किमतींमधल्या अस्थिरतेमुळे अर्थव्यवस्थेची वाढ मंदावू शकते, असंही अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत सेमीकंडक्टर क्षेत्राच्या विकासाबाबत ...

**- - - होल्ड- व्हीसी - --**

*(डिजिटल युगात माहिती आणि संपर्क हे सर्वात महत्त्वाचं साधन बनलं आहे. त्यादृष्टीनं सेमीकंटक्टर क्षेत्राचा विकास सेवा संकल्प अभियानाचा आधारस्तंभ ठरला आहे. आधुनिक*

*माहिती तंत्रज्ञान, आणि औद्योगिक विकासाकरता सेमीकंडक्टर चिप निर्मितीत आत्मनिर्भरता मिळवणं आवश्यक आहे. हे ओळखून केंद्रसरकारने सेमीकंडक्टर अभियान सुरु केलं. या अंतर्गत सेमिकॉन टू पॉईंट ओ या दुसऱ्या टप्प्यात १ कोटी २७ लाख ५०० इतकी वित्तीय तरतूद करण्यात आली. ६ विविध राज्यांमधे मिळून १२ सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. या प्रकल्पांमधली एकूण गुंतवणूक एक लाख ६४ हजार कोटींपर्यंत पोहोचेल. या क्षेत्रात स्टार्टअप आणि लघुउद्योजकांना प्रोत्साहन देण्यात येत असून सरकार सातत्यानं त्यांच्या संपर्कात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात आघाडीच्या उद्योगांच्या प्रमुखांबरोबर सेमीकंडक्टर क्षेत्राविषयी गोलमेज परिषद घेतली. या क्षेत्रातल्या संशोधन आणि विकासाप्रति सरकारची वचनबद्धता त्यांनी यावेळी अधोरेखित केली. या क्षेत्रातल्या विकासामुळे रोजगारनिर्मितीलाही चालना मिळणार आहे.)*

**<><><><>**

सध्या सुरु असलेल्या आंदोलनांमागे काँग्रेसचा कोणताही सकारात्मक उद्देश नसून ते जनतेची दिशाभूल करत आहेत, हिंसाचार आणि अराजक माजवून ते निवडणुकांमधल्या पराभवाचा बदला घेऊ इच्छित आहेत, असा आरोप  संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी केला आहे. लखनौमध्ये ते आज वार्ताहरांशी बोलत होते.

**- - - - होल्ड- बाईट- राजनाथ सिंग - - - -**

या आंदोलनातून देशातलं सरकार पाडायचा हेतू असल्याचं काँग्रेस आणि त्यांच्या सहकारी पक्षांनी नुकतच जाहीर केलं आहे आणि यासाठी त्यांनी बांग्लादेशमधून प्रेरणा घेतली आहे.  यातून हेच स्पष्ट होतं कि हे आंदोलन केवळ एस आय आर किंवा निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी नाही.  राहुल गांधी यांनी अराजकतेला पोषक राजकारण करू नये कारण देशाचं भवितव्य ही सर्वांचीच जबाबदारी आहे असं ते म्हणाले.

काँग्रेस सरकारच्या काळात लावलेल्या आणीबाणीचा, १९८४ साली झालेल्या हिंसाचाराचा तसंच रामभक्तांवर गोळीबार करणाऱ्या सरकारला पाठिंबा देण्याच्या कृतीचा त्यांनी उल्लेख केला. भाजप प्रणित सरकारच्या काळात मात्र देशाची प्रगती झाली असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><>**

देशातली आंदोलनं आणि निदर्शनांचं वार्तांकन पत्रकारांसाठी भारतीय प्रेस काउन्सिलने मार्गदर्शक तत्त्वं जारी केली आहेत. पत्रकारितेची कर्तव्यं प्रभावीपणे पार पाडण्यास मदत करण्याबरोबरच माध्यम कर्मचाऱ्यांची सुरक्षा, जबाबदार वार्तांकन आणि पत्रकार, माध्यम संस्था आणि कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या प्राधिकरणांमध्ये उत्तम समन्वय साधण्यासाठी ही मार्गदर्शक तत्त्वं जारी केल्याचं काउन्सिलनं म्हटलं आहे. पत्रकारांना त्यांच्या माध्यम संस्थांनी किंवा पत्र सूचना कार्यालय आणि माहिती आणि प्रसिद्धी संचालनालयाने मान्यता दिलेलं ओळखपत्र सोबत बाळगण्याचा आणि निदर्शनांचं वार्तांकन करताना ते स्पष्टपणे दिसेल अशा ठिकाणी ठेवण्याचा सल्ला देण्यात आला आहे. आंदोलनांचं वार्तांकन करताना पत्रकारांनी तटस्थ राहून व्यावसायिकता राखण्याच तसंच पोलिसांच्या कामात हस्तक्षेप न करण्याचं आवाहनही काउन्सिलनं केलं आहे.

<><><><>

भारत आणि रशिया यांचा इंद्रा २०२६ हा संयुक्त लष्करी सराव सध्या रशियात सुरू आहे. नौदल, लष्कर आणि हवाई दलांच्या समन्वित मोहिमांचा यात समावेश आहे. आज आणि उद्या सागरी टप्प्याचा सराव होणार असून यात दोन्ही देशांच्या युद्धनौका सहभागी होतील. तर जमिनीवरचा सराव या महिन्याच्या २३ तारखेपर्यंत रशियात होत आहे.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या म्हणजेच NSG च्या स्थापना दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारतावरील प्रत्येक अतिरेकी हल्ला वादळी त्वेषाने परतवून लावत देशाचं धैर्याने आणि निष्ठेने संरक्षण NSGने केलं आहे, असं समाज माध्यमांवरच्या पोस्ट मध्ये त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

पंजाबमध्ये भाजपा सत्तेत आल्यानंतर अमली पदार्थ आणि गुंडगिरीपासून पंजाबला मुक्त करण्यासाठी पूर्ण वचनबद्धतेनं काम करू, याचा पुनरुच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केला आहे. अमली पदार्थांच्या साखळ्या उद्ध्वस्त करणं, राज्यातल्या तरुणांचं भविष्य सुरक्षित करणं आणि गुन्हेगारांच्या विरोधात कठोर पावलं उचलणं हे आपलं ध्येय आहे, असंही त्यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

<><><><>

क्रिकेट इतिहासात पहिल्यांदाच मिश्र क्रिकेट स्पर्धा श्रीलंकेत होणार आहेत. येत्या १४ नोव्हेंबरपासून सुरू होतील. या प्रकाराला टेस्ट ट्वेंटी असं नाव देण्यात आलं असून या स्पर्धेत जगभरातले १३ ते २१ वर्षं वयोगटातले १६० क्रिकेट खेळाडू सहभागी होतील. कसोटी, एकदिवसीय आणि टी-ट्वेंटी क्रिकेट प्रकारानंतरचा हा नवा प्रकार असेल. यात प्रत्येक संघात ११ पुरुष आणि ११ महिला खेळाडू एकामागोमाग एक उतरून धावा करतील, मात्र त्या धावा एकाच संघाची धावसंख्या म्हणून गणल्या जातील.

//<><><><><>//